आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२७ जून २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन सुरु /गेल्या आर्थिक वर्षाचा आर्थिक पाहणी अहवाल सादर, ७ पूर्णांक ६ दशांश टक्के वाढीचा अंदाज
- शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्ती योजना जाहीर करुन निवडणुकीपूर्वी अंमलबजावणी करण्याची माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची मागणी
- नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली रालोआ सरकारच आपल्या आकांक्षा पूर्ण करेल हा जनतेचा विश्वास असल्याचं राष्ट्रपतींचं संसद अधिवेशनातल्या आभिभाषणात प्रतिपादन
- टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज भारताची गतविजेत्या इंग्लंडशी लढत

  **आणि**
- शेअर बाजारात तेजी कायम / सेन्सेक्स ७९ हजाराच्या, तर निफ्टी २४ हजाराच्या विक्रमी पातळीवर बंद

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आज प्रारंभ झाला. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज २०२३-२४ या वर्षाचा आर्थिक पाहणी अहवाल दोन्ही सभागृहांच्या पटलावर मांडला. गेल्या आर्थिक वर्षात राज्याच्या अर्थव्यवस्थेतली वाढ ७ पूर्णांक ६ दशांश टक्के असेल, असा अंदाज या अहवालात वर्तवला आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षात राज्याच्या स्थूल उत्पादनात ९ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांची वाढ झाली होती. सेवा क्षेत्रात सर्वाधिक ८ पूर्णांक ८ दशांश टक्के, तर कृषी क्षेत्रात सर्वात कमी १ पूर्णांक ९ दशांश टक्के वाढ गेल्या आर्थिक वर्षात झाली. उद्योग क्षेत्राचा वाढीचा दर ७ पूर्णांक ६ दशांश टक्के राहील, असं पूर्वानुमान आहे.

गेल्या आर्थिक वर्षात राज्याचं सांकेतिक स्थूल उत्पादन ४० लाख ४४ हजार २५१ कोटी रुपये अपेक्षित आहे. त्या आधीच्या आर्थिक वर्षात तुलनेत त्यात सुमारे ५ लाख कोटी रुपयांची वाढ झाली. सांकेतिक स्थूल राष्ट्रीय उत्पादनात राज्याचा सरासरी वाटा सर्वाधिक आहे, असं या अहवालात म्हटलं आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात राज्याची राजकोषीय तूट २ पूर्णांक ८ दशांश टक्के, महसुली तूट अर्धा टक्के आणि कर्जाचं प्रमाण राज्याच्या उत्पन्नाच्या १७ पूर्णांक ६ दशांश टक्के आहे.

गेल्या आर्थिक वर्षात दरडोई राज्य उत्पन्न २ लाख ७७ हजार ६०३ रुपये असेल, असा राज्य सरकारचा अंदाज आहे. आधीच्या वर्षाच्या तुलनेत त्यात २५ हजार २१४ रुपयांची वाढ झाली आहे. दरडोई उत्पन्नात महाराष्ट्र देशात सहाव्या स्थानी आहे.

परकीय थेट गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र गेल्या आर्थिक वर्षातही पहिल्या स्थानी राहिला आहे.

विधान परिषदेत आर्थिक पाहणी अहवाल तसंच प्रादेशिक नियोजन आणि नगर रचना तसंच महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठासंबंधीचे अध्यादेश सरकारनं पटलावर मांडले. दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या ७ विधेयकांना राज्यपालांची संमती मिळाल्याचं जाहीर करण्यात आलं. त्यानंतर विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी प्रसाद लाड, विलास पोतनीस, अमोल मिटकरी, अभिजीत वंजारी आणि मनीषा कायंदे या सदस्यांची सभापती तालिकेवर नियुक्ती केली.

राज्यभरात सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेसाठी आलेल्या उमेदवारांना योग्य सोयीसुविधा मिळत नसल्याचा मुद्दा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केला. त्यावर, यासंदर्भात सर्व संबंधित यंत्रणांना सूचना दिल्या असल्याचं, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. यानंतर दिवंगत

आजी माजी सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करून विधान परिषदेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

विधिमंडळाचं कामकाज सुरु होण्यापूर्वी विरोधी पक्ष सदस्यांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर निदर्शनं केली. शेतकऱ्यांची कर्जमाफी, वीजबिल माफी, नैसर्गिक आपत्तींचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना मदत इत्यादी मुद्द्यांवर विरोधकांनी घोषणा दिल्या. विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण, भाई जगताप, रवींद्र धंगेकर, अनिल देशमुख आणि इतरांनी विविध मुद्द्यांवरून सरकारचा निषेध केला.

<><><><><>

राज्य विधिमंडळाचं हे अधिवेशन आमच्यासाठी निर्धार आणि निश्चयाचं आहे. गेल्या दोन वर्षांत केलेल्या कामाच्या जोरावर पुन्हा महायुतीचं सरकार आणण्यासाठी आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. निरोप कोण कुणाला देतो, हे येणारा काळच ठरवेल, असंही ते म्हणाले. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान आमच्या सरकारनं दिलं. ड्रग्ज प्रकरणात संपूर्ण राज्यभर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. ड्रग्जची विक्री होत असलेली बांधकाम उद्ध्वस्त करण्याच्या सूचना पुणे आयुक्तांना दिल्या आहेत. शाळा, महाविद्यालयांच्या परिसरातल्या टपऱ्या हटवण्याचे आदेश दिले आहेत. तरुण पिढी वाया जाऊ नये, यासाठी सरकार पावलं उचलत आहे, अशी ग्वाही शिंदे यांनी दिली.

<><><><><>

राज्यातल्या शेतकऱ्यांसाठी तत्काळ कर्जमुक्ती योजना जाहीर करुन निवडणुकीपूर्वी त्याची अंमलबजावणी करावी अशी मागणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. राज्यातल्या शेतकऱ्यांची परिस्थिती गंभीर आहे. दररोज सरासरी ९ शेतकऱ्यांच्या आत्महत्या

होत असल्याचा दावा त्यांनी केला. शेतकऱ्यांना द्यायची १० हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेची भरपाई प्रलंबित आहे, असंही ते म्हणाले.

मध्यप्रदेशाच्या धर्तीवर राज्यातही मुलींसाठी आर्थिक मदत देण्याची योजना राबवण्याचा सरकारचा विचार आहे. पण केवळ मुलींना नव्हे तर मुलांनाही मदत द्यावी, अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली. विधानसभा निवडणुकींसाठी महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करायला त्यांनी नकार दिला. आधी महायुतीनं लोकसभेतल्या पराभवाची जबाबदारी कोणाची हे जाहीर करावं असं आव्हान त्यांनी दिलं.

विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी आगामी निवडणुकीत महाविकास आघाडीच्या घटक पक्षाची प्रत्येकी १ जागा निवडून येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

नीट परीक्षेतल्या घोटाळ्यासंदर्भात राज्यात उघडकीला आलेल्या प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सोपवण्यात आली आहे. याप्रकरणी लातूरच्या दोन शिक्षकांना अटक झाली असून सीबीआयनं हाती घेतलेलं नीट संदर्भातलं हे चौथं प्रकरण आहे.

**<><><><><>**

देशातल्या जनतेनं या सरकारला तिसऱ्यांदा निवडून दिलं आहे कारण नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली रालोआ सरकारच आपल्या आकांक्षा पूर्ण करेल, असा जनतेला विश्वास वाटतो, गेल्या दहा वर्षातल्या सेवा आणि सुशासनावर शिक्कामोर्तब झालं आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज सांगितलं. अठराव्या लोकसभेच्या स्थापनेनंतर संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला त्या आज संबोधित करत होत्या. लोकसभेचं अधिवेशन सोमवारपासून सुरु झालं असून राष्ट्रपतींच्या अभिभाषणानं राज्यसभेच्या अधिवेशनाला सुरुवात झाली. अठरावी

लोकसभा ही अनेक बाबतीत ऐतिहासिक असल्याचं त्यांनी सांगितलं. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीची जगभर चर्चा सुरु आहे, काश्मीरमधल्या यंदाच्या विक्रमी मतदानानं देशाच्या शत्रूंना सडेतोड उत्तर मिळालं असल्याचंही त्या म्हणाल्या. भारत ही जगातली सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था आहे, आरोग्य, पोषण, हवामान बदल अशा अनेक आघाड्यांवर भारत जगाचं नेतृत्व करीत आहे, अनेक जागतिक समस्यांवर उत्तरं शोधत आहे , असं राष्ट्रपतींनी स्पष्ट केलं. देशातले २५ कोटींहून अधिक नागरिक गरिबीतून बाहेर आले आहेत, ही समाधानाची बाब असल्याचं त्या म्हणाल्या. पेपरफुटी प्रकरणाची निःपक्षपाती चौकशी होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणानंतर लोकसभेचं आजचं कामकाज तहकूब झालं. राज्यसभेचं कामकाज सुरु झाल्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सभागृहाला नवीन मंत्र्यांची ओळख करून दिली. नंतर राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज भारताचा सामना गतविजेत्या इंग्लंडशी होत आहे. गयाना इथल्या प्रोव्हिडन्स स्टेडियमवर रात्री आठ वाजता हा सामना सुरु होईल.

आज झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं अफगाणिस्तानवर ९ गडी राखून विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत जाण्याची दक्षिण आफ्रिकेची ही पहिलीच वेळ आहे.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सने आज पहिल्यांदाच ७९ हजार अंकांची पातळी ओलांडली, तर निफ्टीनंही २४ हजार अंकांचा नवा उच्चांक गाठला.

दिवसअखेर सेन्सेक्स ५६९ अंकांची वाढ नोंदवत, ७९ हजार २४३ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १७६ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार ४४ अंकांवर बंद झाला.

आजच्या कामकाजात सुमारे ३०० कंपन्यांच्या समभागांनी ५२ आठवड्यातला उच्चांक गाठला तर २६ कंपन्यांच्या समभागांनी ५२ आठवड्यांची नीचांकी पातळी नोंदवली.

ऊर्जा, माहिती तंत्रज्ञान आणि सिमेंट क्षेत्रातले समभाग आज चढे राहिले तर उद्योग आणि भांडवली वस्तू क्षेत्रातल्या समभागांमध्ये आज मंदीचं वातावरण दिसून आलं .

**<><><><><>**

दोन नक्षलवादी महिलांनी आज गडचिरोली इथं पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. अनेक गुन्ह्यांची नोंद असलेल्या या दोघींवर प्रत्येकी ८ लाख रुपयांचं बक्षीस होतं. २०२२ पासून आतापर्यंत १९ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, नक्षलवाद्यांनी हिंसेचा मार्ग सोडून आत्मसमर्पण करावं आणि स्वाभिमानाचं जीवन जगावं , असं आवाहन पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी केलं आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहतील. या काळात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**